ePaper

**“आमच्या मित्रांना कुणीतरी खोटं सांगून भांग पाजली...”: देवेंद्र फडणवीस**



|वर्ष - 6 |अंक - 320 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!




www.mahaenews.com | |बुधवार, दि. 8 मार्च 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# पिंपरी-चिंचवड नवनगर प्राधिकरण हद्दीतील ‘प्रॉपर्टी कार्ड’चा विषय लागणार मार्गी!

## आ. महेश लांडगे यांनी मांडली लक्षवेधी सूचना: अधिवेशनात सरकारच्या निर्णयाकडे लक्ष

|पिंपरी|
| महाईन्यूज | प्रतिनिधी|

**पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण हद्दीतील ‘प्रॉपर्टी कार्ड’ चा विषय आता मार्गी लागण्याची शक्यता आहे. राज्य विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात आमदार महेश लांडगे यांनी याबाबत लक्षवेधी मांडली आहे. त्यामुळे शिंदे-फडणवीस सरकारकडून सकारात्मक निर्णयाची अपेक्षा आहे.**





पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे विलीनीकरण पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) मध्ये करण्यात आले आहे. मात्र, प्राधिकरणाच्या सुमारे ३० हजार भूखंडाचे प्रॉपर्टी कार्ड बनवण्याचे काम प्रलंबित आहे. २०१८ मध्ये सेक्टर २ मधील मिळकतधारकांना प्रायोगिक तत्वावर प्रॉपर्टी कार्ड देण्यात आले होते. मात्र, त्यानंतरच्या काळात हे काम प्रशासकीय अनास्थेमुळे तसेच दप्तर दिरंगाईमुळे जैसे थे आहे. प्राधिकरण हद्दीचे नकाशे तयार नाहीत. त्यामुळे प्राधिकरणाची हद्द नेमकी काय आहेत? याबाबतही संभ्रम आहे.

जागामालकांचे सातबारे किंवा खरेदीखतावर केवळ ‘प्राधिकरण संपादित’ असा उल्लेख आढळतो. परिणामी, प्राधिकरणच्या जागेत अतिक्रमण आणि बेकायदा बांधकामांचे प्रमाण वाढले आहे. महापालिकेत याबाबत कोणताही लेखाजोखा नाही. याचा परिणाम महसुली उत्पन्नावर होतो. तसेच, मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (महाराष्ट्र राज्य) पुणे यांचेकडील दि. २२ मार्च १९७६ च्या महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १२२ च्या अधिसूचनेनुसार पिंपरी-चिंचवड महापालिका समाविष्ट गावांची नगर भूमापन करण्याची अधिसूचना मंजूर होवून नगर भूमापानाच्या कामाला प्रारंभ करण्यात आला होता. मूळ नगर भूमापनासाठी सविस्तर मोजणी व हक्क चौकशी कामकाज सन १९७६ ते १९८० च्या दरम्यान करण्यात येवून त्याप्रमाणे नकाशा व मिळकत प्रत्रिका तयार करण्यात आल्या आहेत, असे आमदार लांडगे यांनी लक्षवेधी म्हटले आहे.

> “ स्थानिक लोकप्रतिनिधींना विश्वासात न घेता तत्कालीन महाविकास आघाडी सरकारने प्राधिकरणाचे ‘पीएमआरडीए’त विलीनीकरण केले. त्यावेळी सुमारे १ लाख नागरिकांशी संबंधित आणि ४५ ते ५० हजार जागा मालकांच्या ‘प्रॉपर्टी कार्ड’चा प्रश्न ‘जैसे थे’ आहे. महाविकास आघाडीच्या अडीच वर्षांच्या काळात याकडे दुर्लक्ष झाले. १४ वर्षांपासून प्रलंबित असलेला शास्तीकर सरसकट माफीच्या निर्णयाप्रमाणे आता शिंदे-फडणवीस सरकारच्या माध्यमातून महापालिका, पीएमआरडीए आणि भूमि अभिलेख विभागाच्या एकत्रित सहयोगातून ‘प्रॉपर्टी कार्ड’ चा विषय मार्गी लावण्यासाठी आम्ही पुढाकार घेतला आहे. या अधिवेशनात लक्षवेधी सूचना मांडली असून, सकारात्मक निर्णय होईल, अशी अपेक्षा आहे.
> **- महेश लांडगे,** शहराध्यक्ष तथा आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड.पिंपरी-चिंचवड

### प्रॉपर्टी कार्ड’ अभावी महसुली उत्पन्न वाढीबाबत गैरसोय...

» सध्या पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रातील क्षेत्र मूळ नगर भूमापण हक्क चौकशी वेळी विकसित झालेले नव्हते. त्यामुळे मूळ आलेखावर स.नं. बसवून संपूर्ण स.नं. किंवा त्यांचे पोट हिस्स्यास नगर भूमापन क्रमांक देवून मिळकत पत्रिका लिहिलेल्या आहेत. त्यानंतर पिंपरी-चिंचवड महापालिका विकास आराखडा मंजूर करुन सुनियोजित नागरी क्षेत्र विकसित केले आहे. मात्र, भूमि अभिलेख अध्ययावत न केल्यामुळे जमीनधारकांना अधिकार अभिलेखाचा हक्क नोंद, हद्दीचे वाद, वारस नोंदी करणे, वादाचे निरसन, शासकीय प्राधिकरणाच्या जागेवरील अतिक्रमण निश्चित करणे अशा अडचणींचा सामना करावा लागतो. तसेच, महसुली अभिलेख उपलब्ध नसल्यामुळे महसुली उत्पन्नवाढीबाबत गैरसोय होत आहे, याकडे आमदार लांडगे यांनी लक्ष वेधले आहे.

# सायन्स पार्क येथे “पोलीस गौरव” पुरस्कार सोहळा उत्साहात

## डीएफएल अवॉर्ड्स, डिफेन्स फोर्स लीग एक्स आर्मीमेन संस्थेच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन

|पिंपरी|
| महाईन्यूज | प्रतिनिधी|




**अवॉर्ड्स आणि डिफेन्स फोर्स लीगच्या वतीने शनिवार दि.५ मार्च रोजी चिंचवड येथील सायन्स पार्क येथे पोलीस गौरव पुरस्कारांचे आयोजन करण्यात आले होते. पोलीस, माजी सैनिक, शास्त्रज्ञ, शिक्षणतज्ज्ञ एकाच व्यासपीठावर असण्याची शहरातील ही पहिलीच वेळ होती. भारताचे पहिले पॅरालिम्पिक सुवर्णपदक विजेता पद्मश्री मुरलीकांत पेटकर, ब्रिगेडियर हेमंत दधीच – VSM , इस्रोचे शास्त्रज्ञ डॉ. अरुणकुमार सिन्हा, भारतीय तांत्रिक संस्थेचे अध्यक्ष प्राध्यापक नंदकिशोर जगदाळे प्रमुख पाहुणे होते.**

संगणक शास्त्रज्ञ पद्मश्री पद्मभूषण डॉ. विजय भटकर यांनी पोलीस पुरस्कार विजेत्यांना शुभेच्छा दिल्या. स्वागत सुभेदार मेजर यशवंत महाडिक यांनी केले. नो युवर आर्मी आणि नो युवर पोलीस मोहिमेचा परिचय डीएफएलचे संस्थापक नरेश गोल्ला यांनी केला.

डीवायएसपी आरिफा मुल्ला, एसीपी रुक्मिणी गलांडे, पीआय वर्षाराणी पाटील, पीआय रुपाली बोबडे, पीआय रेणुका कदम, पीएसआय दिलीप पालांडे, पोलीस नाईक आतिश खराडे (ज्यांनी देशभक्तीपर गीते गायली), पोलीस नाईक धनंजय पाटील, कॉन्स्टेबल अक्षय इंगवले, हेड कॉन्स्टेबल रमीजा गोलंदाज यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला.

### कार्यक्रम यशस्वीततेसाठी यांचे योगदान

**» आशिष गौंड, सुनील माऊसकर, महिला शरीरसौष्ठवपटू तन्वीर हक, अनिल जगताप, स्वप्नील कांबळे, चंद्रकांत आल्हाट, नीलेश नेवाळे यांना महाराष्ट्र गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डीएफएल टेक्नॉलॉजीचे संचालक नीलेश विसपुते, चेतना कंठाळे यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजक डीएफएलचे संस्थापक नरेश गोल्ला, सुनील वडमारे, माजी पॅरा कमांडो रघुनाथ सावंत, राजेंद्र जाधव, सिद्धराम बिराजदार, मुजीब खान, अजय खोमणे, मिस दृष्टी जैन, संदीप जाधव, रुतुराज अपराजित, निखिल अग्रवाल यांनी केले.**

# अवकाळीने दाणादाण!

## रब्बी पिकांसह द्राक्ष, डाळिंब, केळी, पपई पिकांचे नुकसान

। पुणे। महाईन्यूज ।

**ऐन होळी-धुळवड सणाच्या दिवशी वादळी वाऱ्यासह झालेला अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे राज्याच्या अनेक भागांतील रब्बी हंगामात काढणीला आलेल्या गहू, हरभरा, ज्वारी, कांदा पिकांसह भाजीपाला आणि द्राक्षे, डाळिंब, केळी, पपई फळबागांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. नाशिकसह खान्देश, मराठवाड्यात सर्वाधिक नुकसान झाले आहे.**

जळगाव, धुळे, नंदुरबारसह मराठवाडा आणि नाशिक जिल्ह्यात बहुतांश ठिकाणी अचानक मुसळधार पाऊस झाला. रब्बी हंगामातील गहू, ज्वारी, कांदा, मक्याची काढणी सुरू झाली आहे. अखेरच्या टप्प्यात पाऊस झाल्यामुळे वाळलेली पिके भिजली आहेत. वादळी वाऱ्यांमुळे शेतातील उभी पिके आडवी झाली आहेत. गहू भिजल्यामुळे दर्जा खालावणार आहे. ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यातील भेंडीसह अन्य भाजीपाल्याचे नुकसान झाले. भेंडीची फुले गळणे, करपा, बुरशीचा प्रादुर्भाव वाढला आहे.

नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबारमध्ये द्राक्ष, डाळिंब, केळी, पपईचे पीक वादळी वारा, गारपीट आणि पावसामुळे मातीमोल झाले आहे. खान्देशसह सोलापूरच्या करमाळा तालुक्यातील केळीच्या बागा वादळी वाऱ्यामुळे जमीनदोस्त झाल्या आहेत. निर्यातीसाठी चांगला दर मिळत असतानाच केळीचे पीक हातचे गेले आहे. नाशिकमधील सिन्नर,



निफाड तसेच नगर येथील द्राक्षांची काढणी सुरू आहे. अशा अवस्थेत मुसळधार पाऊस झाल्यामुळे द्राक्षाचे मणी फुटून गळून पडू लागले आहे. वातावरणात बाष्पाचे प्रमाण जास्त असल्यामुळे द्राक्षाचे घड कुजू लागले आहेत. मणी फुटल्यामुळे एका रात्रीतच काळी बुरशी वाढली आहे. द्राक्षांतील साखरेचे प्रमाण कमी झाल्यामुळे दर्जा आणि उत्पादनांवरही परिणाम होणार आहे. परिसरातील पपईच्या बागाही वादळी वाऱ्यामुळे कोलमडून पडल्या आहेत. वाशीम जिल्ह्यातील वाशीम, कारंजा, मानोरा, रिसोड परिसरांत संत्रा बागांचे नुकसान झाले आहे. मोसमी पाऊस परत फिरल्यानंतर पडणाऱ्या प्रत्येक पावसाला अवकाळी पाऊस म्हटले जाते. होळी-धुळवडीच्या दिवशी पडलेला पाऊस यंदाच्या हंगामातील पहिलाच अवकाळी पाऊस आहे.

### आजही हलक्या सरी, गारांचा अंदाज

पुणे : भारतीय हवामानशास्त्र विभागाकडून वर्तवण्यात आलेल्या अंदाजानुसार आज, बुधवारीही राज्याच्या विविध भागांमध्ये पावसाची शक्यता आहे. ८ मार्चपर्यंत काही ठिकाणी मेघगर्जनेसह पावसाच्या हलक्या सरींची शक्यता यापूर्वीच वर्तवण्यात आली आहे. बुधवारी कोकण आणि गोव्यात कोरड्या हवामानाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. मध्य महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाड्याच्या काही भागांमध्ये पावसाच्या हलक्या सरींची, तर काही भागांमध्ये मेघगर्जनेसह पाऊस होण्याची शक्यता आहे.

### धुळ्याला गारपिटीचा तडाखा

**» धुळे जिल्ह्यातील खोरी टिटाने भागात आणि जळगाव जिल्ह्यातील काही भागांत सुमारे तासभर गारपीट झाली. रस्ते, शेतशिवारांत गारांचा सडा पडला होता. सर्वत्र पाढऱ्या रंगाची चादर पसरल्याचे चित्र होते. गारपीट झालेल्या परिसरात रब्बी हंगामातील काढणीला आलेली पिके वाया गेली आहेत.**

### तातडीने पंचनाम्याचे आदेश

**» राज्यातील अवकाळी पावसाने झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करावेत, असे आदेश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. राज्यात झालेल्या अवकाळी पावसाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्यांनी मंगळवारी मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव तसेच जिल्हाधिकाऱ्यांशी संपर्क साधून परिस्थितीची माहिती घेतली. शेतकऱ्यांना तातडीने दिलासा मिळाला पाहिजे. संकटग्रस्त शेतकऱ्यांच्या पाठीशी सरकार आहे. या दृष्टीने महसूल यंत्रणेने लगेच कामाला लागावे, असे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.**

# आनंदाचे रंग, आनंद तरंग!

## » वंचित चिमुकल्यांची रंगली धुळवड

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**होळी त्याबरोबर येणारी धुळवड अन् रंगपंचमी म्हणजे जीवनातील आनंदाचा काळ. कुठल्याही वयातल्या, कुठल्याही वर्गातल्या बच्चे कंपनीसाठी हा उत्सव आनंदाचा ठेवाच जणू! पण बालपणातला हा काळ प्रत्येकाला अनुभवायला मिळतोच असं नाही. अनाथ, अपंग, गंभीर आराजानं ग्रस्त, रस्त्यावर भटकणारी अशी असंख्य वंचित मुलं याबाबत कमनशिबीच! पण या मुलांच्या चेहऱ्यावर आनंद फुलण्याचं काम अनेक वर्षांपासून भोई प्रतिष्ठानच्यावतीनं केलं जात आहे. यंदा प्रतिष्ठाननं आयोजित केलेल्या रंग महोत्सवात तब्बल**



१७०० वंचित मुलांनी सहभाग नोंदवला.

भोई प्रतिष्ठानच्या 'रंग बरसे' या महोत्सवाचं यंदाचं 27 वं वर्ष आहे. यामध्ये अनाथ, एचआयव्ही बाधित, अंध, अपंग मुलं, रेल्वे प्लॅटफॉर्मवर पॉलीश करणारी मुलं, देवदासी भगिनींची मुलं, रस्त्यावर डोंबाऱ्यांचा खेळ करणारी मुलं, मतिमंद मुलं, ऊस तोडणी कामगारांची मुलं अशी वंचित घटकातील मुलं सहभागी होतात आणि आनंद लुटतात. अशा १७०० मुलांनी या महोत्सवाचा आनंद लुटला. रास्ता पेठेतील क्वार्टर गेटजवळील टिळक आयुर्वेद महाविद्यालयाच्या मैदानावर हा रंग महोत्सव पार पडला.

भोई प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष डॉ. मिलिंद भोई म्हणाले, "यंद प्रतिष्ठानच्या रंग महोत्सवात आयोजन करण्यात आलं होतं. त्यात १,७०० विशेष मुलांनी सहभाग घेतला. खरं तर कोरोनाच्या काळात या मुलांना उत्सवाचा आनंद घेता आला नाही. यंदाच्या रंग महोत्सवाला खूप मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला. यामध्ये सर्व घटकातील मुलं सहभागी झाले होते.

तीन वर्षांनंतर झालेल्या या रंग सोहळ्यात मुलं रंगात न्हाऊन गेली होती. त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद हा अवर्णनीय असाच होता. रंग खेळताना ते हरखून गेल्याचे दिसून आले.

डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांच्या चांगुलपणाची चळवळ उपक्रमांतर्गत देखील मुलांशी संवाद साधण्यात आला. त्यांचा सहभाग ही एक महत्वाची गोष्ट होती"

# जनतेला बदल हवा, सर्वांनी एकत्र यावे

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।



जनतेला बदल हवा आहे, बदलासाठी सर्वांनी एकत्र यावे, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवारांनी केले. भाजपच्या विरोधात विरोधी पक्षांनी एकजूट करताना काँग्रेसला सोबत घेणे आवश्यक आहे. काँग्रेस हा या देशातील महत्त्वाचा पक्ष असून प्रत्येक गावात या पक्षाचा कार्यकर्ता आहे, याकडे पवार यांनी लक्ष वेधले.पुण्यातील कसबा पोटनिवडणुकीत भाजपच्या हेमंत रासनेंचा पराभव करून निवडून आलेल्या रवींद्र धंगेकरांनी सोमवारी राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवारांची यांची पुण्यात भेट घेतली. त्यानंतर ते माध्यम प्रतिनिधींशी बोलत होते.

पवार म्हणाले, कसब्यात मविआची एकजूट दिसली. भाजपचा गड ढासळला. भाजपने कसब्यात बापट, टिळकांना डावलून निर्णय घेतले, त्यासोबतच जनतेला बदल हवा आहे, त्यासाठी सर्वांनी एकत्र येण्याची गरज आहे. ते करताना काँग्रेसला सोबत घेणे आवश्यक आहे. नारायणपेठ, सदाशिवपेठ आणि शनिवारपेठ हा भाजपचा गड आहे. त्यामुळे कसब्यात विजय होईल की नाही, याची खात्री नव्हती. कसब्यात गिरीश बापट यांनी अनेक वर्षे प्रतिनिधित्व केले होते. ते लोकांमध्ये असायचे. त्यांचे भाजप आणि त्यांच्या परिवाराशी घनिष्ट संबंध होते. पण भाजपशी संबंध नसलेल्यांशीही त्यांचे मैत्रीचे संबंध होते.

# महाविकास आघाडीची "डोकेदुखी"!

## » भाजपाला आत्मचिंतनाची गरज: प्रभाग 16 मधील आकडेवारी बोलकी!

।पिंपरी।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड महापालिकेची लिटमल टेस्ट म्हणून पाहिले जाणारे चिंचवड विधानसभेची पोट निवडणूक नुकतीच संपन्न झाली. यामध्ये सत्ताधारी भाजपला महाविकास आघाडीसोबत चुरशीचा सामना करावा लागला. केवळ स्वर्गीय लक्ष्मण जगताप यांच्या निधनाची सहानुभूती आणि "जगताप पॅटर्न"मुळेच चिंचवडमध्ये भाजपला यश मिळाले. त्याचबरोबर महाविकास आघाडीतील फुटीचा थेट फायदा भाजपला झाला आहे. महापालिकेचे निवडणूक कधीही लागू शकते त्या अनुषंगाने चिंचवड विधानसभा मतदारसंघात भाजपला यश मिळवण्यासाठी मोठ्या समस्यांना तोंड द्यावे लागणार आहे हे या निकालातून समोर आले आहे.**















वास्तविक, महाविकास आघाडीतील काही माजी नगरसेवक व पदाधिकारी यांनी अपक्ष उमेदवाराच्या पाठीमागे ताकद लावली. त्यामुळे अनेक प्रभागात भाजपला किंचितसे मताधिक्य मिळाले तर भाजपचे प्रभावक्षेत्र असणाऱ्या अनेक प्रभागात राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार विठ्ठल उर्फ नाना काटे यांनी लक्षवेधी मतदान घेतले याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. यामध्ये अपक्ष उमेदवार राहुल कलाटे यांना मिळालेले मतदान महाविकास आघाडी सोबत आले असते तर निकाल वेगळा दिसला असता. कसबा विधानसभा पोटनिवडणुकीच्या निकालातून स्थानिक महाविकास आघाडीतील एकजूट महापालिकेसाठी भाजपला धोक्याची घंटा मानली जात आहे.

### महापालिकेतील राजकीय गणिते

**»यामध्ये भाजपला मिळालेल्या मतापेक्षा महाविकास आघाडी मधील विभागलेल्या मतांची बेरीज १६७१ मतांनी अधिक आहे. या निवडणुकीत भाजपला राष्ट्रवादी कांग्रेसकडून लढलेले नवनाथ लोखंडे व माजी नगरसेवक गणेश भोंडवे यांनीही भाजपला मदत केली आहे. पक्ष विरहीत १०९२ भाजप विरोधात मतदान आहे. ही सर्व एकूण २७६३ मतदान हे सत्ताधारी भाजप विरोधी आहे. त्यामुळे हे मतदान कोणाकडे जाणार आणि महापालिका निवडणुकात महाविकास आघाडी एकत्र येणार का? यावरती महापालिकेतील राजकीय गणिते ठरणार आहेत. त्यामुळे महापालिकेची लिटिल टेस्ट असणाऱ्या पोटनिवडणुकीतून महाविकास आघाडीसाठी फायद्याची तर भाजपसाठी डोकेदुखी वाढणारी आहे हेच दिसून येते.**

राज्यात सत्तेवर असणारे भाजप महानगरपालिकेत मूळच्या चार प्रभाग पद्धतीने निवडणूक लढवण्याचा विचार करत आहे. तर २०१७ मधील प्रभाग क्रमांक – 16 हा वाल्हेकरवाडी, शिंदेवस्ती, रावेत, किवळे, मामुर्डी, विकासनगर या भागात समाविष्ट आहे. या भागात भाजपचे नगरसेवक संगीता भोंडवे व बाळासाहेब ओव्हाळ प्रतिनिधित्व करतात तर राष्ट्रवादी काँग्रेसकडून मोरेश्वर भोंडवे व प्रज्ञा खानोलकर प्रतिनिधित्व करतात प्रभागाचे एकूण मतदान एकूण ५२ हजार ८७८ मतदान आहे. यामधील पोट निवडणुकीत २६,०३७ लोकांनी मतदान केले. एकूण ४८.३०% मतदान झाले.

विधानसभा पोटनिवडणुकीत मतदानाची आकडेवारी पाहता भाजपच्या उमेदवार अश्विनीताई जगताप यांना ११,६३७ मतदान मिळाले. राष्ट्रवादी काँग्रेसचे नाना काटे यांना ९,६१४ तर अपक्ष राहुल कलाटे यांना ३६९४ मतदान मिळाले. सोबत इतर अपक्षांना ८०३ व नोटा यांना २८९ मतदान झाले.

---

# आ. अश्विनी लक्ष्मण जगताप यांनी औंध जिल्हा रुग्णालयाला दिली भेट

## » रुग्णांना सुविधा उपलब्ध करून देण्याचे दिले आदेश

।पिंपरी।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड शहरातील पहिल्या लोकनियुक्त व चिंचवड विधानसभा मतदारसंघाच्या आमदार अश्विनी लक्ष्मण जगताप यांनी निवडून आल्यानंतर चौथ्याच दिवशी सोमवारी (दि. ६) सांगवी येथील औंध ऊरो जिल्हा रुग्णालयाला भेट दिली. रुग्णालयाच्या सर्व विभागांची पाहणी करून त्यांनी अनेक रुग्णांशी संवाद साधला. रुग्णांना दिल्या जाणाऱ्या वैद्यकीय सोयीसुविधांचा आढावा घेतला. त्यानंतर जिल्हा शल्य चिकित्सकांसह रुग्णालयाच्या प्रशासनातील अन्य वैद्यकीय अधिकाऱ्यांसोबत चर्चा करून रुग्णांना विविध सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याचे आदेश दिले.**



चिंचवड मतदारसंघाचे भाजप आमदार दिवंगत लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या निधनामुळे या मतदारसंघात नुकतीच निवडणूक पार पडली. त्यामध्ये दिवंगत लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या पत्नी अश्विनी लक्ष्मण जगताप यांचा विजय झाला. चिंचवड मतदारसंघातील जनतेने त्यांना भरघोस मतांनी निवडून दिले. आमदार झाल्यानंतर त्यांनी चौथ्याच दिवशी सांगवी येथील औंध ऊरो जिल्हा रुग्णालयाला भेट दिली. दिवंगत आमदार लक्ष्मणभाऊ जगताप हे देखील औंध ऊरो जिल्हा रुग्णालयात रुग्णांना उत्तम प्रकारच्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कायम आग्रही असायचे. त्यांनी या रुग्णालयात आमदार निधीतून अनेक चांगल्या सुविधाही उपलब्ध केल्या होत्या.

आता त्यांच्यानंतर आमदार झालेल्या त्यांच्या पत्नी अश्विनी लक्ष्मण जगताप यांनीही औंध ऊरो जिल्हा रुग्णालयाला भेट देत रुग्णांसाठी असलेल्या सुविधांचा आढावा घेतला. यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नागनाथ यमपल्ले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. भगवान पवार आदी उपस्थित होते. आमदार अश्विनी लक्ष्मण जगताप यांनी रुग्णालयातील प्रत्येक विभागात जाऊन तेथील परिस्थितीची पाहणी केली. रुग्णांना दिल्या जाणाऱ्या औषधांबाबत माहिती घेतली. अनेक रुग्णांशी संवाद साधून रुग्णालयात येणाऱ्या अनुभवाबाबत माहिती घेतली. काही महिला रुग्णांनी आमदार अश्विनी लक्ष्मण जगताप यांच्या गळ्यात पडून हंबरडा फोडला. त्यांना धीर देत त्यांनी काहीही काळजी न करण्याचे आवाहन केले. रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांना उपचार मिळतात का, याची तेथील डॉक्टरांकडेही त्यांनी विचारणा केली. रुग्णालयातून नागरिक परत गेले नाही पाहिजेत, अन्यथा तुमच्यावर ॲक्शन घेईल. मी उद्या पुन्हा रुगणालयाला भेट देईल, असे म्हणत त्यांनी डॉक्टरांना सज्जड दम भरला.

त्यानंतर त्यांनी याच रुग्णालयात आयोजित केलेल्या जनऔषधी सप्ताह कार्यक्रमाला उपस्थित राहून मार्गदर्शन केले. यावेळी आरोग्य विभागाचे उपसंचालक डॉ. राधाकिशन पवार, अन्न व औषध प्रशासनाचे सहआयुक्त एस. व्ही. प्रतापवार, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नागनाथ यमपल्ले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. भगवान पवार आदी उपस्थित होते. गोरगरीब रुग्णांना स्वस्त जेनेरिक औषधे उपलब्ध करून देणे काळाजी गरज असल्याचे सांगितले. त्यासाठी या रुग्णालयात जेनेरिक औषध केंद्र सुरू करण्यासाठी प्रस्ताव तयार करण्याची सूचना त्यांनी प्रशासनाला केली.

> "रुग्णांना मुबलक प्रमाणात औषधे, महिलांच्या प्रसुतीगृहात विविध सुविधा, डायलिसिस युनिट तसेच नव्याने सुरू करण्यात येणाऱ्या दहा डायलिसिस बेड तातडीने रुग्णांना उपलब्ध करून देण्याचे आदेश जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नागनाथ यमपल्ले व इतर डॉक्टरांना दिले आहेत. सांगवीतील औंध ऊरो जिल्हा रुग्णालयात जिल्हाभरातून रुग्ण उपचारासाठी येत असतात. रुग्णांना चांगला वैद्यकीय सुविधा मिळाव्यात यासाठी दिवंगत आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांनी नेहमीच प्रयत्न केले होते. मी सुद्धा त्याचा पाठपुरावा करून रुग्णांना चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नेहमी प्रयत्नशील राहणार आहे.
>
> **- आमदार अश्विनी जगताप,** आमदार चिंचवड विधानसभा

## संपादकीय »

# शिमग्याच्या नावानं...!

***सर्वप्रथम तुम्हाला होलिकोत्सवाच्या अनेक शुभेच्छा. होळीच्या शुभेच्छा वेगळ्या शब्दात द्यायच्या असतात, हे मला ठाऊक आहे. परंतु, गेले काही महिने महाराष्ट्रात जो राजकीय शिमगा सुरु आहे तो पाहता वेगळ्या शुभेच्छा देण्याची गरज नाही, असे मला वाटते.***

महाराष्ट्रातील राजकीय वातावरण सध्या अतिशय गढूळ झाले आहे. हवेत विखार भरुन राहिला आहे. मोटारीतून जाताना नुसती काच खाली केली तरी या राज्यात शिमगा सुरु असल्याचे सहज कळते! असो. राजकीय कटुता कमी करण्यासाठी मी, म्हणजे नानासाहेबांनी पुढाकार घ्यावा, अशी मागणी मध्यंतरी होत होती. होलिकोत्सवाच्या निमित्ताने त्या दिशेने काही करता येते का, हे पाहण्यासाठी हे पत्र लिहीत आहे.

हल्ली जो उठतो तो दणादण तोंडाला येईल त्या लाखोल्या (आम्हाला) वाहताना दिसतो. कुठल्याही राजकीय पुढाऱ्याने तोंड उघडले की शिमगा सुरु होतो. त्याचे तोंड मिटले की दुसरा सुरु करतो, आणि त्याचा शिमगा आटोपेपर्यंत तिसरा सुरु होतो! गेले काही महिने हे असेच चालू आहे. रेडा काय, खोकी काय, गद्दार काय...

आमचे माजी मित्र मा.राऊतसाहेब तर बारमाही शिमगा करत हिंडत आहेत. त्यांनी तर अगदी हद्दच केली आहे. रात्रीच्या सुमारास होळ्या पेटवण्याची प्रथा आहे. हे राऊतमहाशय सकाळी नऊ-दहा वाजताच होळी पेटवतात! असे किती दिवस चालणार?

आपण साऱ्या पक्षाच्या नेत्यांनी मिळून निदान एक दिवस तरी सौजन्य दिवस पाळावा, आणि तो होळीचा असावा, असे वाटते. त्या दिवशी एकमेकांशी सौहार्दाने बोलावे, मग वर्षभर शिमगा सुरु ठेवता येईल! हे सहज शक्य होईल, पण तुमचे नवे मित्र मा. उधोजीसाहेब आणि त्यांचे शिलेदार राऊतसाहेब यांना कोणी पटवून द्यावे? ते माझा (अजूनही) फोन घेत नाहीत. तुम्ही हे काम कराल का? या कामाचे थोडे क्रेडिट तुम्हालाही मिळेल. नाहीतरी हल्ली तुम्ही त्यांचे प्रवक्ते असल्यासारखेच बोलत असता. कळवा!मा. उधोजीसाहेब, सर्वपक्षीय कटुता टाळण्यासाठी तुमचे माजी मित्र नानासाहेबांनी पुढाकार घेतल्याचे दिसून येत आहे. गेले काही दिवस तुम्ही त्यांना आणि त्यांच्या नेत्यांना ज्या लाखोल्या वाहात आहात, त्या बंद व्हाव्यात म्हणून त्यांनी ही नवी खेळी केली असावी, असा अंदाज आहे. होळीचा एक दिवस आपण साऱ्यांनी मौनव्रत पाळून बारमाही शिमगा सुरु ठेवावा, अशी त्यांची सूचना आहे. तुमचे मत काय? कळावे. तुमच्या मताला महाविकास आघाडीचा विरोध असणार नाही. खात्री बाळगा.



## आनंदी सकाळ

### ज्या घरात प्रेम, शांती, आणि आपुलकी असते तिथं लक्ष्मी नेहमी नांदते...

एकदा एका व्यक्तीवर लक्ष्मी रुसली आणि जाता जाता त्याला म्हणाली.... आता माझ्या जागी तुझ्या घरात दारिद्र्य येणार आहे. परंतु मी तुला एक वरदान मागण्याची संधी देत आहे. तुझी इच्छा असेल ते माग. माणूस खूप समजूतदार होता, तो म्हणाला जर दारिद्र्य येणारंच असेल तर त्याला कोणी थांबवू शकत नाही, बस्स फक्त त्याला म्हणावं माझ्या परिवारात एकमेकांत प्रेम आणि जिव्हाळा राहू दे. लक्ष्मी तथास्तु म्हणाली आणि निघून गेली. काही दिवसानंतर - धाकटी सून स्वयंपाक बनवत होती, तिनं भाजीला मीठमसाला टाकला आणि दुसरं काम करायला निघून गेली. त्यानंतर मोठी सून आली, न चाखताच मीठ टाकलं, आणि कामाला निघून गेली. त्याचप्रमाणे आणखी दोन सुनांनी न चाखताच भाजीत मीठ टाकलं आणि निघून गेल्या. जेव्हा माणूस आला आणि जेवायला बसला तर भाजी खारट लागल्यावर तो समजून गेला की दारिद्र्य आलेलं आहे.

# नैराश्यावर मात व्यायामाने






जगभरात सर्वत्र देश मानसिक आरोग्याच्या समस्यांशी झुंजत आहेत. लक्षावधी लोक नैराश्य, चिंता आणि अन्य मानसिक आजारांना तोंड देत असताना, दीर्घकाळ रेंगाळलेल्या करोनासाथीने यात भरच घातली आहे. औषधे आणि समुपदेशन यांसारखे पारंपरिक उपचार मानसिक आरोग्यासाठी केले जातात. मात्र या पारंपरिक उपचारांपेक्षा व्यायामासारखा उपाय अधिक प्रभावी ठरतो, असे अलिकडेच झालेल्या संशोधनात समोर आले आहे.

नैराश्य आणि चिंता या महत्त्वाच्या आरोग्य समस्या आहेत. मानसिक आरोग्याच्या समस्यांमुळे वैयक्तिक तसेच सामाजिक पातळीवर मोठा फटका बसतो. मात्र आठवड्यातून १५० मिनिटे वेगाने चालणे, वजन उचलणे, योग यांसारखा शारीरिक व्यायाम केल्यास नैराश्य, चिंता आणि अन्य मानसिक समस्या लक्षणीयरीत्या कमी होतात, असे या अभ्यासात आढळले. नैराश्य, एचआयव्ही, मूत्रपिंडाचे आजार असलेल्या व्यक्ती, गर्भवती तसेच प्रसूतीपश्चात सर्वाधिक फरक दिसून आल्याचेही संशोधकांनी नोंदवले. व्यायामाची तीव्रता जेवढी अधिक तेवढा त्याचा लाभही अधिक असतो, थोडक्या कालावधीसाठी केलेल्या व्यायामापेक्षा सहा ते १२ आठवडे सातत्याने व्यायाम करणे अधिक लाभदायक ठरते, असेही या अभ्यासात आढळले.

मानसिक आरोग्यासाठी अन्य उपचारपद्धतींच्या तुलनेत व्यायाम कितपत अधिक प्रभावी ठरतो, याचे मोजमापही संशोधकांनी केले. यामध्ये औषधे किंवा अन्य उपचारांच्या तुलनेत व्यायाम हा दीड पट अधिक प्रभावी असल्याचे आढळले. एवढेच नव्हे, तर कमी खर्च, कमी दुष्परिणाम याच्या जोडीलाच योग्य वजन, हृदय आणि हाडांच्या आरोग्यात सुधारणा हे शारीरिक लाभ आणि बौद्धिक लाभही व्यायामामुळे प्राप्त होतात.

# ‘स्त्री’ नदीसारखी असते... ‘प्रवाही’!

**‘सामर्थ्यवान स्त्रीशी सहजीवन हवे असेल तर एकमेकांविषयी आदर ठेवा. एकमेकांत भावनिक गुंतवणूक जरूर करा, पण ‘एकमेकांच्या व्यावसायिक जीवनाआड आपण येत नाही ना’ याची काळजी नक्की घ्या. स्वातंत्र्य महत्त्वाचं. तुमचंही आणि त्यांचंही. स्वातंत्र्य म्हणजे व्यभिचार नव्हे. तुम्ही तुमच्या मित्रांबरोबर-मैत्रिणींबरोबर बसून तासन् तास गप्पा मारू शकता. तशा त्याही! पण त्याचा अर्थ असा नाही की, तुम्ही किंवा त्या व्यभिचारी आहेत. त्यांची तुमच्यातली भावनिक गुंतवणूक, प्रेम, आदर आणि तिला तिच्या मित्र-मैत्रिणींबरोबर वेगळ्या आयुष्याचा पूर्ण अधिकार आहे.**

सामर्थ्यवान, स्वतंत्र, यशस्वी स्त्री आकर्षक वाटते? तुम्हाला अशी स्त्री जोडीदार किंवा जीवनसाथी म्हणून हवी आहे? सावधान! कारण काय आहे... पोळं आहे म्हटल्यावर माश्या तर घोंघावणारच... पण अशा स्वतंत्र, सामर्थ्यवान, कर्तव्यतत्पर, काव्यशास्त्र विनोद पारंगत, संभाषणकला प्रवीण स्त्रीशी सहजीवन तुम्हाला झेपणार आहे? तुमच्या मनाची ती तयारी आहे? तिचा बाणेदार स्वभाव आणि तिचं यश तुम्ही पचवू शकणार आहात?

हे लिखाण वाचून जर राग येणार असेल, चलबिचल होणार असेल, तर परत एकदा विचार करा. जोडीदार माझी सशक्त बरी की हवी मला अबला नारी, मात्र एक लक्षात घ्या, समर्थ असो वा अबला- चांगुलपणा ऑप्शनल नसतो. आणि हो, सामर्थ्यवान महिलांना तुमची गरज नसते. तुम्हाला जर एखाद्या स्वतंत्र वृत्तीच्या सामर्थ्यवान महिलेचं मन



जिंकायचं असेल, तर पहिली गोष्ट लक्षात घ्या की त्यांना तुमची ‘कशाहीसाठी’ गरज नसते. ना तुमच्या पैशांची, ना तारणहार म्हणून, ना संरक्षणकर्ता म्हणून, ना तुमच्या भेट वस्तूंची, ना तुमच्या कौतुकाची.

तिला तुमची गरज नसते; पण हो, तुम्ही खरंच छान माणूस असाल, तर तुमच्यात तिला रुची मात्र नक्की असू शकेल. तिला छान जोडीदार असावा अशी तिची इच्छा असते, पण ती तिची गरज नसते. उगीच तिचा रक्षणकर्ता, पालनकर्ता बनण्याच्या भानगडीत पडू नका. कारण ‘तसं’ बनणं ही तुमची भावनिक गरज असू शकेल, तिची नाही. त्यामुळे उगीच ‘मोठेपणा’चा आव आणण्याऐवजी त्यांना ‘बरोबरी’ची जागा दिलीत, तर तुमच्या स्वप्नाची सुंदरी तुम्हाला मिळण्याची शक्यता जास्त असते. ‘समर्थ आणि स्वतंत्र’ स्त्रीला तोडीस तोड भागीदार पाहिजे असतो, त्यांच्यावर नियंत्रण ठेवणारा कुणी पोलिस नाही. लक्षात घ्या, तिला तुम्ही ‘हवे’ आहात म्हणून हे नातं असतं, तुमची ‘गरज’ आहे म्हणून नाही. आणि जर प्रत्येक बारीकसारीक गोष्टीत जर तिला तुमची गरज पडत असेल तर एक गोष्ट लक्षात घ्या- प्रॉब्लेम तुमच्यात आहे, तिच्यात नाहीस्वतंत्र आणि सामर्थ्यवान स्त्रियांनी तुम्हाला सुधारण्याचा आणि तुमचं बेबी सिटिंग करण्याचा मक्ता घेतलेला नाही. त्यांना तुमच्यात लहान मूल नको आहे, त्यांना हवा आहे तोडीस तोड भागीदार. हातातल्या सगळ्या गोष्टी टाकून त्यांनी आयुष्यभर तुमचं संगोपन करावं ही अपेक्षाच मुळात गैर आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आलिंगनें घडे ।
मोक्ष सायुज्यता जोडे ।।१।।
ऐसा संताचा महिमा ।
जाली बोलायाची सीमा ।।ध्रु.।।

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# राज्यातील शेतकरी संकटात!

## अवकाळी पावसामुळे नुकसानग्रस्त भागांचे तत्काळ पंचनामे करण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश!

**। मुंबई । महाईन्यूज ।**

**राज्यातील अनेक भागात ढगाळ वातावरणासह अवकाळी पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. अशातच सोमवारी रात्री पुणे, मुंबईसह राज्यातील अनेक भागात अवकाळी पावसाने हजेरी लावली. यावेळी मोठ्या प्रमाणात गारपीट झाल्याचंही बघायला मिळालं.**

या गारपिटीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचं मोठं नुकसान झालं आहे. दरम्यान, अवकाळी पावसाने फटका बसलेल्या शेतकऱ्यांच्या शेताचे पंचनामे त्वरित करण्याचे निर्देश राज्य सरकारने दिले आहेत.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज सकाळी मुख्य सचिव तसेच जिल्हाधिकाऱ्यांशी बोलून त्यांच्याकडून परिस्थितीची माहिती घेतली. यावेळी महसूल विभागाने तातडीने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतीचे पंचनामे करावे, असे निर्देश त्यांनी दिले. तसेच शेतकऱ्यांना तातडीने दिलासा मिळाला पाहिजे, असे म्हणत संकटग्रस्त शेतकऱ्यांच्या पाठीशी हे सरकार उभं आहे, असा विश्वासही त्यांनी राज्यातील शेतकऱ्यांना दिला.



दरम्यान, सोमवारी अचानक आलेल्या या पावसामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं. नाशिकमध्ये द्राक्षांची झाडं कोसळली तर येवल्यात काढणीस आलेला गहू जमीनदोस्त झाला. तर तीन एकर कांदादेखील भिजल्याने शेतकरी संकटात सापडला आहे. जळगावमध्येही वादळी वाऱ्यासह पाऊन झाल्याने केळी आणि गहू या पिकांचं नुकसान झाल्याचं पाहायला मिळालं. तसेच पालघरमध्येही आंब्यासह इतर रब्बी पिकांचं मोठं नुकसान झालं. तसेच अमरावतीसह विदर्भातील काही भागातही कापसांच्या पिकाचं मोठं नुकसान झालं.

# बळीराजा संकटात! नाशिकमध्ये गारांचा पाऊस

## पुढील काही दिवस राज्यात पावसाची शक्यता



**। नाशिक । महाईन्यूज ।**

**अवकाळी पाऊस आणि गारपिटीचा राज्यातल्या अनेक भागांना फटका बसला आहे. कांदा, हरभरा, आंबा, द्राक्ष मातीमोल होण्याची वेळ आली आहे, त्यामुळे शेतकऱ्यांना मोठा फटका बसला आहे.**

नाशिकमध्ये तिसऱ्या दिवशीही अवकाळी पावसाच्या सरी कोसळल्या. कळवण तालुक्याला सायंकाळी अवकाळी पावसाने झोडपले. कळवण तालुक्यातील एकलहरे, नाकोडे, शिरसमणी, ओतूर परिसरात गारांचा पाऊस पडला.

कळवण पाठोपाठ चांदवड तालुक्यात ही अवकाळी पाऊस आणि गारपीट कोसळली. सायंकाळी कळवण तालुक्यातील काही भागात गारपीट झाल्यानंतर चांदवड तालुक्यातील काही भागात अवकाळी पावसाने हजेरी लावली. यामुळे पिकांना फटका बसण्याची आणि रोगराई वाढण्याची शक्यता आहे.

राज्यभरात धुलवड सण उत्साहात साजरा होत आहे. त्यातच आज राज्यभरात पावसाच्या सरी कोसळल्या. काही ठिकाणी रिमझिम पाऊस आला तर काही ठिकाणी गारा पडल्या.

यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेय. नाशिकसह राज्यात काही ठिकाणी हलक्या ते मध्यम सुरुपाचा पाऊस कोसळला.

त्याशिवाय मुंबई, पुणे, नवी मुंबई, ठाणे या ठिकाणीही पावसाने हजेरी लावली. राज्यातील बहुतांश भागात आज ढगाळ वातावरण होतं. दरम्यान अवकाळीचा मारा झेलणाऱ्या शेतकऱ्याला तातडीनं मदत करा, अन्यथा मोठा एल्गार पुकारण्याचा इशारा किसान सभेचे डॉ. अजित नवलेंनी इशारा दिलाय.

### तात्काळ मदत पोहोचविण्यात येईल

**धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्यातील खोरे टीटाने भागात काल गारपीटी सह अवकाळी पावसाने मोठ्या प्रमाणात हजर लावल्याने पिकांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे यात कांदा हरभरा या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून त्यामुळे शेतकऱ्यांना मोठा फटका बसला आहे, साक्री तालुक्यात झालेल्या गारपिटीमुळे तिथे अक्षरशः सडून गेली असेल या नुकसानग्रस्त भागाची आज जिल्ह्याची पालकमंत्री नामदार गिरीश महाजन यांनी साक्री तालुक्यात भेट देऊन पाहणी केली... यावेळी माजी मंत्री जयकुमार रावल खासदार डॉक्टर हिना गावित धुळे लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉक्टर सुभाष भामरे यांच्यासह प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते पुढील दोन दिवसात पंचनामे पूर्ण करून त्याचा अहवाल शासनास सादर करण्यात येईल तसेच नुकसान व्यवस्था शेतकऱ्यांपर्यंत तात्काळ मदत पोहोचविण्यात येईल असे आश्वासन पालकमंत्री गिरीश महाजन यांनी यावेळी दिले...**

### महाराष्ट्रासह 'या' भागात पावसाचा अंदाज

**IMD नुसार, 6 ते 9 मार्च दरम्यान महाराष्ट्र, 6 ते 7 मार्च रोजी राजस्थान आणि गुजरातमध्ये मेघगर्जनेसह हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे. तसेच 6 ते 7 मार्च रोजी ताशी 30 ते 40 किलोमीटर वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे आणि पूर्व राजस्थान, पश्चिम मध्य प्रदेश, गुजरात आणि मध्य महाराष्ट्रातील काही ठिकाणी गारपीट होण्याचा अंदाजही वर्तवण्यात आला आहे. दुसरीकडे, 7 मार्च रोजी पश्चिम राजस्थान, मराठवाडा आणि विदर्भात असेच हवामान राहील.**

# "मंत्रिमंडळ विस्तार केला नाही तर..."

## अजित पवारांचा मुख्यमंत्र्यांना इशारा

**। पाथर्डी । महाईन्यूज ।**



शिंदे-फडणवीस सरकारला विविध मुद्द्यांवरुन विरोधीपक्ष नेते अजित पवार यांनी चांगलंच धारेवर धरलं. मंत्रिमंडळ विस्तारावरुनही त्यांनी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना घणाघात केला. तर मंत्रिपदाच्या आशेवर असलेल्यांना आमदारांना त्यांनी डिवचलं आहे. पवार म्हणाले, मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्री प्रत्येक आमदाराला मंत्रिपदाला देऊ असं सांगत आहेत. पण मंत्रिमंडळ विस्तार केला नाही तर आहेत ते आमदारही निघून जातील, असा इशाराही यावेळी त्यांनी दिला.

अवकाळी पावसानं राज्याचं वाटोळ केलं आहे. निसर्ग कधी कोपलं सांगता येत नाही, अशा वेळी आपण शेतकऱ्याच्या पाठिशी उभं रहायला पाहिजे याबद्दल तर हो लोक बोलायला तयार नाहीत. अशा पद्धतीचं सरकार आज सत्तेत आलेलं आहे. त्यांनायाबाबत विचारलं ते फक्त म्हणतात आम्ही करु, आम्ही देऊ काही काळजी करु नका. परंतू तशा पद्धतीचा निर्णय काही होत नाही, अशा शब्दांत अजित पवारांनी सरकारला धारेवरही धरलं.

## परीक्षार्थींचे वाहतूक कोंडीमुळे प्रचंड हाल

**कराड :** पुणे-बंगळुरु महामार्गावरील कराडजवळ रस्त्याच्या सहापदरीकरणासाठी येथील उड्डाणपुलांच्या पाडकामांमुळे तासन् तास वाहतूक कोंडी होऊन दहावी व बारावीच्या परीक्षार्थींचे प्रचंड हाल होत आहेत. तरी, या परीक्षार्थींची ही गैरसोय, नुकसान टाळण्यासाठी आमदार पृथ्वीराज चव्हाण सरसावले आहेत. आमदार चव्हाण यांनी मंगळवारी पोलीस अधिकाऱ्यांसमवेत पत्रकार बैठकीत वाहतूक कोंडी निर्मूलनाच्या उपाययोजनांची माहिती दिली. चव्हाण म्हणाले, की इयत्ता दहावी व बारावीच्या परीक्षांचा कालावधी २६ मार्चपर्यंत असून, या परीक्षांमध्येच कराडजवळ महामार्गावर वाहतूक कोंडी होत असल्याने परीक्षार्थी व पालकांची तारांबळ उडत आहे. तरी, परीक्षेच्या आधी चार तास कुठेही वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी आपण संबंधित यंत्रणेसमवेत बैठका घेऊन नियोजन केले आहे. कराडजवळ महामार्गावरील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी अनेक उपाययोजना अंमलात आणल्या जाणार आहेत.

# बांगलादेश: 7 मजली इमारतीत स्फोट!

## » 14 लोकांचा जागीच मृत्यू, 100 जण जखमी



या स्फोटानंतर अग्निशमन दलाच्या ११ गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या असून बचावकार्य सुरू आहे.

**| नवी दिल्ली | महाईन्यूज |**

**बांगलादेशची राजधानी ढाका येथील गुलिस्तान भागात एका बहुमजली इमारतीत स्फोट घडल्याची घटना समोर आली आहे. या दुर्दैवी घटनेत १४ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. तर जवळपास १०० नागरिक जखमी झाले आहेत. मंगळवारी दुपारी चारच्या सुमारास ही घटना घडली आहे.**

घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या ११ गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या असून बचावकार्य सुरू आहे. अग्निशमन दलाच्या जवानांकडून जखमी लोकांना ढाका मेडिकल कॉलेज रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात येत आहे. मृतांची संख्या वाढण्याची भीती स्थानिक अधिकाऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे.

ज्या इमारतीमध्ये स्फोट घडला आहे, ती इमारत ढाका येथील सिद्दीक बझारमध्ये स्थित आहे. या इमारतीत अनेक कार्यालये आणि दुकानं आहेत. घटनेच्या दिवशी मंगळवारी चारच्या सुमारास या सात मजली इमारतीच्या तळ मजल्यावर असणाऱ्या सॅनिटाइझ वस्तुंच्या दुकानात हा स्फोट घडला.

# नागालँडमध्ये राष्ट्रवादीचे आमदार भाजपसोबत जाणार?

## शरद पवारांसमोर मोठा पेच



**| मुंबई | महाईन्यूज | प्रतिनिधी |**

नागालँडमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे सात आमदार निवडून आलेले आहेत. राष्ट्रवादी हा नागालँडमध्ये तिसऱ्या क्रमांकाचा पक्ष ठरला आहे. परंतु शरद पवार यांच्यासमोर एक वेगळाच पेच निर्माण झालेला असून उद्या त्याबाबत निर्णय होणार आहे.

नागालँड सरकारचा शपथविधी सोहळा आज पार पडला. या सोहळ्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, नागालँडचे राज्यपाल ला गणेशन, भाजप अध्यक्ष जेपी नड्डा आणि आसामचे मुख्यमंत्री हिमंत बिस्वा सरमा हे शपथ ग्रहण सोहळ्याला उपस्थित होते.

नागालँडमध्ये एनडीपीपी नेते नेफियू रिओ यांनी पाचव्यांदा राज्याच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. नागालँडमध्ये झालेल्या निवडणुकीत NDPP-भाजप युतीने ३७ जागा जिंकल्या आहेत. भाजपची एनडीपीपीसोबत युती आहे. २०१८ च्या निवडणुकीत रिओ यांनी भाजपसोबत युती केली होती. गेल्या निवडणुकीत युतीला ३० जागा मिळाल्या होत्या. यावेळी युतीने ३७ जागा जिंकल्या.

नागालँडमध्ये गतवेळीही विरोधी पक्ष नव्हता, सर्वपक्षीय सरकार होतं. यावेळीह तशीच परिस्थिती निर्माण करण्याचा राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदारांचा विचार आहे. तेथील स्थानिक नेते सत्तेमध्ये सहभागी होण्यासाठी आग्रही आहेत. तसं झालं तर शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसवर भाजपसोबत गेल्याचा शिक्का पडू शकतो.

शरद पवार यांच्या भेटीनंतर निर्णय होणार असल्याचं राष्ट्रवादी काँग्रेसचे नागालँड प्रभारी नरेंद्र वर्मा यांनी सांगितलं. भाजपसोबत जाण्यावरुन तेथील स्थानिक नेते आणि वरिष्ठ नेत्यांमध्ये मतभेद निर्माण झाल्याचं सांगितलं जात आहे.'

### भाजपसोबत जाण्यावरुन नेत्यांमध्ये मतभेद

**» नागालँडमध्ये गतवेळीही विरोधी पक्ष नव्हता, सर्वपक्षीय सरकार होतं. यावेळीह तशीच परिस्थिती निर्माण करण्याचा राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदारांचा विचार आहे. तेथील स्थानिक नेते सत्तेमध्ये सहभागी होण्यासाठी आग्रही आहेत. तसं झालं तर शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसवर भाजपसोबत गेल्याचा शिक्का पडू शकतो.**

# कर्नाटकमध्ये भाजपचा धुव्वा उडणार?

## » कर्नाटक विधानसभा : पक्षांतर्गत सर्व्हेत काँग्रेसला 224 पैकी 140 जागा



**| नवी दिल्ली | महाईन्यूज | प्रतिनिधी |**

**कर्नाटक विधानसभेच्या एकूण २२४ जागांपैकी १४० पेक्षा जास्त जागांवर विजय मिळणार असा दावा काँग्रेसचे अध्यक्ष डी. के. शिवकुमार यांनी मंगळवारी केला. आगामी काळात सत्ताधारी भारतीय जनता पक्षाचे अनेक विद्यमान आमदार काँग्रेसमध्ये प्रवेश करतील, असा दावाही शिवकुमार यांनी केला.**

भाजपचे दोन माजी आमदार आणि म्हैसूरचे माजी महापौर यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केल्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते. या नेत्यांमध्ये कोल्लेगाळ्याचे आमदार जी. एन. नानजुंदस्वामी, विजापूरचे माजी आमदार मनोहर ऐनापूर आणि म्हैसूरचे माजी महापौर पुरुषोत्तम यांचा समावेश आहे.

२०२२ च्या गुजरात निवडणुकीच्या निकालानंतर लगेचच भाजपला कर्नाटकात निवडणुका घ्यायच्या होत्या, पण नंतर त्यांनी माघार घेतली, असा दावाही शिवकुमार यांनी केला. महापुराप्रमाणे जिल्हा स्तरावर अनेक नेते पक्षात प्रवेश करत आहेत, काही मान्यवर नेते पक्षात प्रवेश करत आहेत. जनमत काँग्रेसच्या बाजूने असल्याचे स्पष्ट झाले, असंही शिवकुमार यांनी नमूद केलं."आमच्या आधीच्या सर्वेक्षणात आम्ही 136 जागांचा अंदाज वर्तवला होता, आता आमचे सर्वेक्षण आम्हाला 140 जागा मिळतील अस सांगत आहे. बदलाला सुरुवात झाली आहेत. हे आम्ही राज्यभर केलेल्या यात्रेदरम्यान अनुभवल्याचं ते म्हणाले.शिवकुमार म्हणाले की, विधानसभा निवडणुकीला आता ५० दिवस शिल्लक आहेत. २०२२ च्या गुजरात निवडणुकीनंतर भाजपला कर्नाटकमध्ये निवडणुका घ्यायच्या होत्या. त्यासंदर्भात अधिकाऱ्यांशी ही चर्चा केली होती, पण त्याला उशीर करण्यात आला. याचे कारण म्हणजे, भाजपला वाटते की जेवढे दिवस निवडणुका लांबतील, तेवढच ते त्यांच्यासाठी फायदेशीर ठरेल.

# सत्येंद्र जैन, सिसोदियांच्या अडचणी वाढल्या

## CM केजरीवालांनंतर राष्ट्रपतींनीही स्वीकारला राजीनामा



**| नवी दिल्ली | महाईन्यूज | प्रतिनिधी |**

दारु घोटाळ्याचा आरोप असलेले दिल्लीचे उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांनी 28 फेब्रुवारीला सर्व खात्यांचा राजीनामा दिला होता.

आता राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनीही त्यांचा राजीनामा स्वीकारला आहे. यासोबतच सत्येंद्र जैन यांचा राजीनामाही स्वीकारण्यात आला आहे.

यापूर्वी दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांनी दोघांचे राजीनामे स्वीकारले होते. आता राष्ट्रपतींनीही मनीष सिसोदिया आणि जैन या मंत्र्यांचे राजीनामे तत्काळ प्रभावानं स्वीकारले आहेत.

गृह मंत्रालयाच्या अधिसूचनेत ही माहिती देण्यात आली आहे. मनीष सिसोदिया हे दिल्ली उत्पादन शुल्क धोरणातील भ्रष्टाचारात अडकले होते. याप्रकरणी 26 फेब्रुवारीला अटक करण्यात आली होती.28 फेब्रुवारी रोजी मनीष सिसोदिया आणि सत्येंद्र जैन यांनी आपल्या पदांचा राजीनामा दिला होता. सिसोदिया यांच्यासोबतच कायदा आणि आरोग्य मंत्री सत्येंद्र जैन यांचाही राजीनामा राष्ट्रपतींनी स्वीकारला आहे. सत्येंद्र जैन हे मनी लॉन्ड्रिंग प्रकरणी प्रदीर्घ काळापासून तिहार तुरुंगात आहेत.

# शहनाजच्या डोक्यात हवा



टीव्ही मनोरंजन विश्वातील प्रसिद्ध अभिनेत्री शहनाज गिल ही सध्या वेगळ्याच कारणामुळे चर्चेत आली आहे. बिग ब्रॉसमधून प्रेक्षकांच्या मनाचा ठाव घेतलेल्या या अभिनेत्रीचा येत्या दिवसांत बॉलीवूडचा भाईजान सलमान खानसोबत चित्रपट येतो आहे.

सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या एका व्हिडिओमध्ये शहनाज गिलनं चक्क मीडियाच्या लोकांवर केलेल्या कमेंटसमुळे ती चर्चेत आली आहे. त्यामुळे ती मोठ्या प्रमाणात ट्रोल देखील झाली आहे. गेल्या काही दिवसांपासून शहनाज एका वेगळ्याच झोनमध्ये आहे. बिग बॉसपासून सतत लाईमलाईटमध्ये असणाऱ्या शहनाज गिलला प्रेक्षकांकडून मोठा प्रतिसाद मिळाल्याचे दिसून येत आहे.कपिल शर्मा हा त्याच्या झिग्वाटो हा चित्रपटाच्या प्रमोशनसाठी शहनाजच्या शो मध्ये गेला होता. त्यावेळी शहनाजनं तिथं असलेल्या मीडियावर संताप व्यक्त केला आहे.त्यांच्यावर एकेरी प्रतिक्रिया देत तिनं नेटकऱ्यांची नाराजी स्वतावर ओढावून घेतली आहे. आता तिला मोठ्या प्रमाणावर नेटकऱ्यांनी ट्रोल केले आहे. बिग बॉसच्या १४ व्या सीझनमधील महत्वाची सेलिब्रेटी म्हणून शहनाज चर्चेत राहिली.

# अमृता खानविलकरचा सोशल मीडियाला रामराम

मराठमोळी अभिनेत्री अमृता खानविलकर सध्या चर्चेत आहे. आपल्या अभिनयासोबत नृत्याने सर्वांना भूरळ घालणारी लावण्यवती सध्या तिच्या आगामी सिनेमामुळे चर्चेत नसून एका वेगळ्याच कारणाने चर्चेत आली आहे. अभिनेत्रीने आता सोशल मीडियावरुन ब्रेक घेतला आहे. एक पोस्ट शेअर करत तिने चाहत्यांना यासंदर्भात माहिती दिली आहे. अमृता इंस्टाग्राम आणि फेसबुक या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर चांगलीच ॲक्टिव्ह होती. इंस्टाग्रामवर तिचे तब्बल 3.7 मिलियन फॉलोअर्स आहेत. सर्वाधिक फॉलोअर्स असणाऱ्या मराठी सेलिब्रिटींच्या यादीत अमृताचं नाव पहिल्या पाचमध्ये आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून ती चाहत्यांच्या संपर्कात होती. वैयक्तिक आयुष्यासह आगामी प्रोजेक्टबद्दल अनेक गोष्टी ती चाहत्यांसोबत शेअर करत होती.

अमृताची पोस्ट काय आहे?


अमृताने खास पोस्ट शेअर करत सोशल मीडियावरुन ब्रेक घेत असल्याची माहिती चाहत्यांनी दिली आहे. तिने लिहिलं आहे,"लवकरच तुम्हाला पुन्हा भेटेल... परत येण्यासाठी योग्य वेळेची प्रतिक्षा आहे". पोस्ट शेअर करत तिने लिहिलं आहे,"लवकरच पुन्हा भेटू... गुडबाय... मी ब्रेक घेत आहे".



# 'तू झूठी मैं मक्कार' चित्रपटाला मिळालं जबरदस्त ॲडव्हान्स बुकिंग

श्रद्धा कपूर आणि रणबीर कपूरचा 'तू झुठी मै मक्कार' हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटातून श्रद्धा आणि रणबीर ही फ्रेश जोडी प्रथमच प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे. लव रंजन दिग्दर्शित या चित्रपटाचा ट्रेलरही प्रेक्षकांच्या चांगलाच पसंतीस पडला आहे. तरुण पिढीचे प्रेमाबद्दलचे विचार आणि प्रेमाकडे बघायचा दृष्टिकोन यावर चित्रपटात प्रकाश टाकण्यात आला आहे.

रोमँटिक कॉमेडी धाटणीच्या या चित्रपटाचं 'तेरे प्यार में' हे फ्रेश गाणंसुद्धा प्रेक्षकांनी डोक्यावर घेतलं आहे. अरिजित सिंगच्या आवाजातील हे गाणं लोकांना चांगलंच आवडलं आहे, शिवाय यात श्रद्धा आणि रणबीरमधील केमिस्ट्रीसुद्धा प्रेक्षकांना आवडली आहे. यामधील श्रद्धाचा बोल्ड अंदाज आणि रणबीरचा डान्सही लोकांच्या पसंतीस पडला आहे. सध्या श्रद्धा आणि रणबीर या चित्रपटाचं जबरदस्त प्रमोशन करताना दिसत आहेत.





# कथित बॉयफ्रेंडने जान्हवी कपूरला दिल्या वाढदिवसाच्या शुभेच्छा



अभिनेत्री जान्हवी कपूर मागच्या काही काळापासून तिच्या चित्रपटांपेक्षा खासगी आयुष्यामुळे जास्त चर्चेत असते. अलीकडे ती तिचा एक्स बॉयफ्रेंड शिखर पहारियामुळे चर्चेत आली आहे. जान्हवी कपूर बरोबरचा फोटो शेअर करत त्याने तिला शुभेच्छा दिल्या आहेत. या फोटोमुळे पुन्हा एकदा या दोघांच्या नात्याबद्दल चर्चा सुरु झाल्या आहेत. जान्हवी कपूरचा आज वाढदिवस, बॉलिवूडमधील कलाकारांनी तिला शुभेच्छा दिल्या आहेत. शिखर पहारियाने आपल्या इन्स्टाग्राम अकाउंटवर स्टोरी शेअर करत शुभेच्छा दिल्या आहेत. या फोटोत जान्हवी त्याच्या खूपच जवळ दिसत आहे. दोघांचा रोमँटिक अंदाज दिसत आहे. वाढदिवसाच्या शुभेच्छा आणि हार्ट ईमोजी असा कॅप्शन दिला आहे.मागच्या आठवड्यात

# लेनिंगच्या वादळात यूपीचा पालापाचोळा!

## 20 षटकात 4 बाद 211 धावांचा डोंगर




।इंदूर ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**दिल्ली कॅपिटल्सने यूपी वॉरियर्सविरूद्धच्या सामन्यात 20 षटकात 4 बाद 211 धावांचा डोंगर उभारला. दिल्लीकडून सलामीवीर मेग लेनिंगने 70 धावांची तुफानी खेळी केली. त्यानंतर जेस जोनासेनेने 20 षटकात नाबाद 42 तर जेमिमाहने 22 चेंडूत नाबाद 34 धावा करत तिला चांगली साथ दिली. या दोघींनी पाचव्या विकेटसाठी नाबाद 67 धावांची भागीदारी रचत संघाला 211 धावांपर्यंत पोहचवले.**

नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करणाऱ्या यूपी वॉरियर्सचा हा निर्णय दिल्ली कॅपिटल्सचे सलामीवीर मेग लेनिंग आणि शफाली वर्मा यांनी उलटा पाडला. या दोघींनी पॉवर प्लेमध्ये जवळपास 10 च्या सरासरीने धावा करण्यास सुरूवात केली.

मेग लेनिंगने आक्रमक फटकेबाजी करत हिरव्या गार खेळपट्टीवरही यूपीच्या गोलंदाजांची धुलाई केली. या दोघींनी 6.3 षटकात 67 धावांची सलामी दिली. अखेर ताहिला मॅग्राथने शफालीला 17 धावांवर बाद करत दिल्लीला पहिला धक्का दिला.

मात्र दुसऱ्या बाजूने लेनिंगने आपला दांडपट्टा सुरू ठेवत दिल्लीला 9 षटकात 87 धावांपर्यंत पोहचवले. लेनिंगने 34 चेंडूत नाबाद 53 धावांची अर्धशतकी खेळी केली. मात्र मार खाणाऱ्या यूपी च्या गोलंदाजांवर वरूण राजांना दया आली. अचानक पाऊस पडू लागल्याने खेळ थांबवण्यात आला.

यूपी वॉरियर्सने पावसाच्या व्यत्ययानंतर सामन्यावर पुन्हा पकड मिळवण्याचा प्रयत्न केला. एकलस्टोनने मारिझाने कापला 16 धावांवर बाद केले. दरम्यान, सलामीवीर मेग लेनिंगने 12 व्या षटकात दिल्लीला 112 धावांवर पोहचवले होते. मात्र गायकवाडने लेनिंगला 70 धावांवर बाद करत दिल्लीला तिसरा धक्का दिला. ईस्माईलने दिल्लीच्या 10 चेंडूत 21 धाा करणाऱ्या एलिस कॅप्सीला बाद केले. जेमिमाह रॉड्रिग्ज आणि जेस जोनासेन यांनी पाचव्या विकेटसाठी 34 चेंडूत 67 धावांची नाबाद भागीदारी रचत दिल्लीला 20 षटकात 211 धावांपर्यंत पोहचवले. जोनासेनने आक्रमक फलंदाजी करत 20 चेंडूत 42 धावा चोपल्या. तर जेमिमाहने तिला 22 चेंडूत नाबाद 34 धावा करत चांगली साथ दिली.

# धुळवडीच्या रंगात रोहित-विराट दंग!

## संपूर्ण भारतीय संघाने बसमध्ये धुळवड साजरी केली

। मध्य प्रदेश ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**देशभरात होळीचा सण साजरा केला जात आहे. बॉर्डर गावसकर ट्रॉफीच्या चौथ्या कसोटीसाठी भारतीय संघ अहमदाबादमध्ये आहे, जिथे सर्वांनी होळी खेळली (क्रिकेटर्स होळी खेळत आहेत). विराट कोहलीपासून कर्णधार रोहित शर्मापर्यंत सगळेच रंगात दिसले. रोहित शर्मा, विराट कोहली यांनी मंगळवारी अप्रतिम होळी खेळली. होळीच्या निमित्ताने भारतीय संघ एका वेगळ्याच मूडमध्ये दिसला.**

संघ बसमध्ये रोहितला अश्रू अनावर झाले. त्याने विराट कोहलीवर रंग फेकले. रंगांच्या या उत्सवात कोहलीही लाल-पिवळ्या रंगात दिसला. रोहित, कोहली, श्रेयस अय्यर, शुबमन गिल यांची धमाल पाहून चाहते त्यांना काय झाले असे विचारू लागले. कोहली स्वतःला डान्स करण्यापासून रोखू शकला नाही. टीम इंडियाही होळीच्या रंगात रंगली आहे. मंगळवारी सराव सत्रानंतर नरेंद्र मोदी स्टेडियममधून हॉटेलमध्ये परतताना भारतीय खेळाडूंनी जोरदार होळी खेळली. टीम बसमध्ये सेलिब्रेशन सुरूच होते. सलामीवीर शुबमन गिलने याचा व्हिडिओ पोस्ट केला आहे. त्यात माजी कर्णधार विराट कोहली गिलच्या मागे डान्स करताना दिसला. त्याच्या मागे कर्णधार रोहित शर्माही दिसला, ज्याने गिलला व्हिडिओ बनवताना पाहून दोघांनाही बडवले. संघाचे उर्वरित खेळाडूही बसमध्येच एकमेकांवर गुलाल उधळताना दिसले.

**इशान-सूर्या हॉटेलमध्ये**



### चौथी चाचणी गुरुवारपासून

**भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील कसोटी मालिकेतील चौथा कसोटी सामना गुरुवारपासून अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर खेळवला जाणार आहे. दोन्ही संघ स्टेडियममध्ये सराव करत आहेत. मालिकेतील पहिले 2 कसोटी सामने जिंकून भारताने मालिकेत २-१ अशी आघाडी घेतली आहे. इंदोरमधील शेवटची कसोटी जिंकून ऑस्ट्रेलियाने वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या अंतिम फेरीत धडक मारली होती.**

### खेळले धुळवड

टीम बसमध्ये होळी खेळल्यानंतर टीम इंडियाच्या खेळाडूंनी हॉटेलमध्येही होळी खेळली. सर्वजण कोरड्या रंगांची होळी खेळताना दिसत होते.

# मुंबई इंडियन्सचा सलग दुसरा विजय

। पीटीआय। महाईन्यूज ।
वृत्तसंस्था ।



महिला प्रीमियर लीगमधील चौथा सामना आज मुंबईतील ब्रेबॉर्न स्टेडियमवर खेळला गेल. हा सामना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु आणि मुंबई इंडियन्स संघात पार पडला. या सामन्यात मुंबईने बंगळुरु ९ गडी राखून मोठा विजय नोंदवला. आरसीबीने प्रथम फलंदाजी करताना मुंबईसमोर १५६ धावांचे लक्ष्य ठेवले होते. प्रत्युत्तरात मुंबई इंडियन्स संघाने १४.२ षटकात १ बाद १५९ धावा करत विजय मिळवला. या स्पर्धेतील मुंबईचा हा सलग दुसरा विजय आहे.

मुंबईकडून हेली मॅथ्यूजने सर्वाधिक नाबाद ७७ धावा केल्या. त्याचबरोबर नॅट सिव्हरने ५५ धावांची नाबाद खेळी केली. मुंबईचा या स्पर्धेतील हा सलग दुसरा विजय आहे. या विजयासह मुंबईचा संघ गुणतालिकेत अव्वल स्थानावर पोहोचला आहे.

### हेली मॅथ्यूजला मिळाला सामनावीराचा पुरस्कार

**हेली मॅथ्यूजने प्रथम गोलंदाजी करताना ४ षटकांत २८ धावा देताना ३ विकेट्स घेतल्या. त्याचबरोबर फलंदाजी करताना ३८ चेंडूचा सामना करताना नाबाद ७७ धावा केल्या. तिने या खेळीत १३ चौकार आणि १ षटकार लगावला. तसेच नॅट सायव्हर-ब्रंटसोबत दुसऱ्या विकेट्ससाठी नाबाद ११४ धावांची शान दार भागादारी केली. नॅट सायव्हर-ब्रंटने २९ चेंडूत नाबाद ५५ धावांची खेळी साकारली. ज्यामध्ये ९ चौकार आणि एका षटकारचा समावेश होता.**